# वॉइस ऑफ हल्लाबोल

FOR THE CHILDREN, BY THE CHILDREN

PAGE 4 • Rs. 5

VOLUME 6 ISSUE 1 • JUNE 2019

INITIATED BY SALAAM MUMBAI FOUNDATION

ग्रामीण विशेष आवृत्ती


# तंबाखू की फुप्फुसांचे आरोग्य ?

**३१ मे हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक तंबाखू विरोधी दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. ह्या वर्षी जागतिक आरोग्य संघटनेद्वारे 'तंबाखू की फुप्फुसांचे आरोग्य' ही संकल्पना देण्यात आली होती.**






सलाम मुंबई फाउंडेशनमार्फत २९ मे २०१९ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे इ -सिगरेटचे वाढते प्रमाण ह्याबाबत प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री **मा. श्री. एकनाथ शिंदे**, जागतिक आरोग्य संघटनेच्या रिजनल एडव्हायजर **मा. जगदिश कौर**, आरोग्य विभागाचे प्रिंसिपल सेक्रेटरी **श्री. प्रदीपकुमार व्यास** आणि सहसंचालक **मा. डॉ. साधना तायडे** इ. मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. येणाऱ्या काळात इ -सिगरेटवर बंदी घालण्यात यावी ह्यासाठी शालेय विद्यार्थ्यांनी मंत्री महोदयांना लिखित निवेदन सादर केले.




३० मे रोजी तंबाखू आणि फुप्फुसांवर होणारे दुष्परिणाम याबद्दल मंत्रालयात प्रदर्शन आयोजित करण्यात आले. ह्याप्रसंगी तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री **मा. श्री. राजकुमार बडोले** हे उपस्थित होते. मंत्रालयातील कर्मचाऱ्यांसाठी फुप्फुसांची कार्यक्षमता तपासणी देखील करण्यात आली. ३१ मे रोजी मुंबई सेंट्रल येथील १२ बसला तंबाखूविरोधी संदेश देणारे स्ट्रीकर चिकटवून त्याचे विमोचन आगार प्रबंधक मा. श्री. सुनील पवार हयांनी केले. तेथील कर्मचारी आणि उपस्थित प्रवासी हयांमध्ये तंबाखू आणि फुप्फुसांवर होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृती केली गेली.

## शुभ संदेश



**वंदना कृष्णा**
अपर मुख्य सचिव,
शिक्षण आणि क्रीडा विभाग,
महाराष्ट्र शासन

"महाराष्ट्रात तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन ही एक सार्वत्रिक बाब आहे आणि त्याचेच दुष्परिणाम आमच्या शालेय विद्यार्थ्यांवरही होत आहेत. शहरी असो वा ग्रामीण विद्यार्थी, आज मोठ्या प्रमाणावर तंबाखूजन्य पदार्थांच्या जाळ्यात गुरफटला जात आहे. आदिवासी समाजातील विद्यार्थी हा अधिक प्रमाणात 'चघळून' तंबाखूजन्य पदार्थ सेवन करीत असल्याचे निदर्शनास येते. 'तंबाखूमुक्त शाळा अभियानाद्वारे' आपण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांवर व्यसनमुक्तीचे संस्कार करीत आहोत. यवतमाळ, वर्धा, नंदुरबार आणि धुळे जिल्हे अभियानात अग्रेसर आहेत.

चला तर राज्यातील नव्या पिढीला व्यसनमुक्त राखण्यासाठी सर्वजण एकत्र येऊया आणि महाराष्ट्र राज्य हे 'जगातील पहिले तंबाखूमुक्त शाळांचे राज्य' बनवूया!



**पद्मश्री मधु मंगेश कर्णिक**
लेखक

"मी माझ्या संपूर्ण जीवनात तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन केलेले नाही आणि महाराष्ट्रातील संपूर्ण जनतेला मी विनंती करतो की निरामय जीवनासाठी आपण तंबाखूजन्य पदार्थांचे व्यसन करू नये. महाराष्ट्राच्या नवी पिढीत व्यसनमुक्तीचे संस्कार घडविणाऱ्या 'तंबाखूमुक्त शाळा अभियानास' माझ्या हृदयपूर्वक शुभेच्छा!



## श्री. विनोद तावडे ह्यांचा 'बेस्ट सपोर्टिव्ह पॉलिटिकल लीडर' पुरस्काराने सन्मान करण्यात आला

'तंबाखू की आरोग्य विषयावरील ४ थ्या राष्ट्रीय परिषदेमध्ये' महाराष्ट्राचे तत्कालीन शिक्षणमंत्री विनोद तावडे हयांचा नरोत्तम सेखसरिया फाउंडेशन आणि सलाम मुंबई फाउंडेशनद्वारे तंबाखूमुक्त अभियानासाठी 'बेस्ट सपोर्टिव्ह पॉलिटिकल लीडर' हा पुरस्कार प्रदान करून सन्मान करण्यात आला.

**शैक्षणिक वर्ष २०१८ - १९ मध्ये Tobacco Free School App वर महाराष्ट्र राज्यातून एकूण २२, ७९० शाळांनी नोंदणी केली.**

त्यातील अचूकरीत्या ११ निकष पूर्ण केलेल्या १०,२४७ शाळांना आणि त्यातील अभियानाचे नेतृत्व करणाऱ्या शिक्षकवृंदास ह्या शैक्षणिक वर्षातील प्रशिक्षण कार्यक्रमादरम्यान 'सन्मानपत्र' देऊन गौरविण्यात येईल.

### तंबाखूमुक्त शाळा ॲप स्थिती : महाराष्ट्र

तंबाखूमुक्त शाळा -ॲपवर नोंदणी झालेल्या शाळा

**२२,७९०**

| ११ निकष पूर्ण केलेल्या तंबाखूमुक्त शाळा | ८ ते १० निकष पूर्ण केलेल्या शाळा | ५ ते ७ निकष पूर्ण केलेल्या शाळा |
|---|---|---|
| १०२४७ | ९२०२ | ३३४१ |



## हसत खेळत तंबाखूमुक्तीकडे

सलाम मुंबई फाउंडेशन, डी.एच.एफ.एल., संहिता व जिल्हा परिषद औरंगाबाद हयांच्या संयुक्त विद्यमाने फुलंब्री तालुक्यात चिंचोली, दरेगाव दरी, वाघोला, लोहगड नांद्रा व बाभूळगाव ह्या पाच गावांमध्ये 'तंबाखूमुक्त गाव' हा उपक्रम राबवला जात आहे. ह्या उपक्रमांतर्गत पाच गावांत विविध जाणीव जागृताचे काम सुरू आहे. ह्या उपक्रमातंर्गत गावांमध्ये येणाऱ्या शाळा तंबाखूमुक्त बनल्या आहेत. २७ फेब्रुवारी २०१९ रोजी बालमेळावा कार्यक्रमाचे आयोजन फुलंब्री तालुक्यातील राम मंदिर सभागृहात करण्यात आले होते. ह्या वेळी तालुक्यातील १५ शाळांमधून ४०० विद्यार्थी, ३५ शिक्षक, पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. बाल मेळाव्यामध्ये तंबाखूमुक्त सापशिडी, तंबाखूमुक्त महाराष्ट्र निवडणूक, तंबाखूमुक्त टॅटू, तंबाखूमुक्तीचा राक्षस हया माध्यमातून तंबाखूचे दुष्परिणाम विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. 'गर्व आहे मला मी तंबाखूमुक्त असल्याचा' ह्या सेल्फी स्टँडमुळे तंबाखूमुक्तीच्या वातावरणात चांगले रंग भरले होते. विद्यार्थ्यांना जादूगाराच्या माध्यमातून सुद्धा तंबाखूमुक्तीचे धडे देण्यात आले.

फुलंब्री तालुक्याचे सभापती **श्री. सर्जेराव मेटे**, गटशिक्षणाधिकारी **श्री. वाणी सर**, चेतना फाउंडेशनच्या **श्रीमती. गायत्री रांदड** ह्यांच्या हस्ते ६८ तंबाखूमुक्त शाळांना, पाच गावांतील ३४ तंबाखूमुक्त ग्रामस्थांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

## तंबाखूचा नाश करणारा नाशिक जिल्हा




सलाम मुंबई फाउंडेशन आणि एव्हरेस्ट फाउंडेशन ह्यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक जिल्ह्यात तंबाखू नियंत्रण कार्यक्रम गेली ४ वर्षे सुरू आहे. नाशिक जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी **डॉ. वैशाली झणकर** ह्यांच्या मार्गदर्शनाखाली 'तंबाखूमुक्त शाळा अभियानाला' आता फारच गती प्राप्त झाली आहे.

२०१८-१९ ह्या शैक्षणिक वर्षात एकूण ११०४ शाळा 'तंबाखूमुक्त शाळा ॲपवर' रजिस्टर करण्यात आल्या; निफाड आणि चांदवड हे तालुके '१०० टक्के तंबाखूमुक्त शाळंचे तालुके' म्हणून घोषित करण्यात आले. मा.पुष्पावती पाटील (सहाय्यक शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग) आणि डॉ.वैशाली झणकर (शिक्षणाधिकारी, प्राथमिक) ह्यांच्या हस्ते निफाड आणि चांदवड तालुक्यांतील अधिकारी आणि मुख्याध्यापकांना प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यात लखमापूर हे गाव तंबाखूमुक्त करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. कम्युनिटी वर्कर्स गावातील घराघरांत जाऊन ग्रामस्थांना व्यसनमुक्तीची महती समजावतात.

लखमापूरवासीयांद्वारे दिवाळी निमित्त तंबाखू-मुक्तीचा संदेश देण्यासाठी ५ फुटाचा आकाशकंदील गावच्या प्रवेशद्वारावर लावण्यात आला होता. होळी निमित्त 'तंबाखूची प्रतीकात्मक होळी' गावात साजरी करण्यात आली होती. मार्च महिन्यात गावातील 'कडवा इग्लिश स्कूलच्या' पटांगणात तंबाखूविरोधी 'बाल मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले. ह्या मेळाव्यात ४०३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तंबाखूमुक्तीवर चित्रकला, निबंधलेखन अणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन केले गेले. गावच्या सरपंच श्रीमती मंगलताई सोनावणे, एव्हरेस्ट कंपनीचे प्लँट हेड श्री. विजयेंद्र बाबू, एच.आर. हेडश्री. विजय सियाट आणि श्री. संदीप देशमुख ह्यांच्याहस्ते स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच ग्रामस्थांसाठी तंबाखूमुक्तीचे पोस्टर्स प्रदर्शनही भरविण्यात आले होते.

## संपादकीय

## अभियानातील सहयोगी संस्था

# जगातील पहिल्या तंबाखूमुक्त शाळांच्या राज्याकडे महाराष्ट्राची घौडदौड



**महाराष्ट्र राज्यातील नवी पिढी व्यसनमुक्त आणि आरोग्यसंपन्न राखण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, सामाजिक न्याय विभाग आणि सलाम मुंबई फाउंडेशन २००२ सालापासून कार्यरत आहे. विविध प्रशिक्षणे, उपक्रम, मेळावे, शाळाभेटी अशा माध्यमांतून सुरू झालेला प्रवास हा राज्यातील जिल्हे आणि तालुके तंबाखूमुक्त शाळांचे घोषित करण्यापर्यंत येऊन पोहचला आहे आणि ह्याचे श्रेय हे त्या तालुक्यातील, जिल्हयातील शिक्षक आणि अधिकाऱ्यांचे आहे.**



शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चा प्रवास हा नांदेड जिल्हयातील तज्ज्ञ मार्गदर्शक आणि मुख्याध्यापकांच्या प्रशिक्षणाने सुरू झाला. १५ ऑगस्ट २०१८ रोजी महाराष्ट्रातील मुख्याध्यापकांना 'तंबाकू से आझादी' रॅली काढण्याचे आवाहन करण्यात आले. महाराष्ट्रातील अनेक मुख्याध्यापक-शिक्षकांनी 'तंबाकू से आझादी' रॅली काढून गावागावांत तंबाखूमुक्त चळवळ नेण्याचा प्रयत्न केला. त्यात भंडारा जिल्हयातील **ठाणेश्वर निखाडे सरांनी** काढलेली रॅली लक्षात राहणारी ठरली. त्यांनी घराघरांत जाऊन गावकऱ्यांना जाब विचारला की गावातील विद्यार्थी तंबाखूमुक्त गावासाठी कार्य करीत आहेत; तरी तुम्ही तंबाखूचे व्यसन का सोडत नाही. २६ ऑगस्ट २०१७ला शालेय विद्यार्थ्यांनी तंबाखूसेवन करणाऱ्यांना, विक्रेत्यांना राखी बांधून व्यसनापासून दूर राहण्याचा आणि अवैधरीत्या शाळेच्या १०० यार्ड परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्री करू नये हयासाठी विनंती केली. तर काही विद्यार्थ्यांनी जिल्हयाचे जिल्हाधिकारी, जि.प. अध्यक्ष, जि.प.सी.ई.ओ. हयांना भेटून आपला जिल्हा तंबाखूमुक्त शाळांचा जिल्हा करण्याची विनंती केली. कोल्हापूर जिल्हयातील इ. २ रीतील विद्यार्थिनी **सिद्धी बेरकळ** जेव्हा सी. ई. ओ. **श्री. अमन मित्तल** ह्यांना भेटली तेव्हा तिचे व्यसनमुक्तीचे विचार ऐकून ते आवाक झाले. त्यांनी तिला आपल्या जवळच्या खुर्चीवर बसून तिचे सर्व म्हणणे ऐकून घेतले. त्यानुसार आपला जिल्हा हा तंबाखूमुक्त शाळांचा जिल्हा बनविण्यास त्यांनी नियोजन व कार्यवाहीस सुरुवात केली.

'एक पत्र व्यसनमुक्तीसाठी' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम शिक्षण विभाग आणि सलाम मुंबई फाउंडेशनने जागतिक कर्करोग दिनी म्हणजे ४ फेब्रुवारी, २०१९ला राबविला. विदयार्थी शाळांमध्ये व्यसनमुक्तीचे संस्कार घेतात परंतु घरात, गावात, समाजात व्यसनी व्यक्तींना पाहतात. शिक्षण विभागाच्या मुख्य कार्य अधिकारी **श्रीमती प्राची साठे** ह्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात विद्यार्थ्यांना आपल्या परिचयातील व्यक्तीस व्यसनमुक्त होण्यासाठी एक पत्र लिहून देण्याचे आवाहन करण्यात आले. ह्या आवाहनास अनेक शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. जे विद्यार्थी आपल्या परिचयातील व्यक्तीचे व्यसन सोडविण्यास यशस्वी होतील त्यांना आणि त्यांच्या शिक्षकांना १५ ऑगस्ट,२०१९पासून 'व्यसनमुक्तीसाठी महाराष्ट्रभूषण' प्रमाणपत्र प्रदान करण्यात येतील. सदर अभियानात सकाळ माध्यम समूह, साम टीव्ही ह्यांची फार मदत झाली आहे. आजचा गृहपाठातून दर सोमवारी तंबाखूचे दुष्परिणाम, तंबाखूमुक्त शाळांच्या यशोगाथा महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यन्त पोहचविता आल्या. महाराष्ट्रातील विविध संस्था - संघटना, राष्ट्रीय सेवा योजना, लायन्स आणि रोटरी क्लब ह्यांचा अभियानास पाठिंबा असल्याने अभियानास अधिक बळकटी मिळाली. महाराष्ट्रातील २८ हजारांहून अधिक शाळा ह्या आता तंबाखूमुक्त शाळा ऍपवर रजिस्टर झाल्या असून, गेल्या शैक्षणिक वर्षात **नंदुरबार** आणि **धुळे** हे जिल्हे आणि **निफाड, चांदवड, नागभीड** हे तालुके तंबाखूमुक्त शाळांचे जाहीर झाले आहेत. ह्यात त्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी,




मुख्यकार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, शिक्षण आणि आरोग्य विभागातील अधिकारी, शिक्षक आणि मुख्याध्यापक तसेच विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वपूर्ण ठरला आहे. चंद्रपूर, गोंदिया, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग हे जिल्हे तंबाखूमुक्त शाळा जाहीर करण्यात अग्रेसर आहोत.महाराष्ट्रासोबत ७ राज्यांमध्ये सलाम मुंबई फाऊंडेशनचे कार्य विस्तारलेले असून ५६९२ शाळांपर्यंत आपण विविध संस्थांमार्फत पोहोचलो आहोत.

६ जून, २०१९ला (शिवराज्याभिषेक दिन) महाराष्ट्र शासनाने परिपत्रक काढून महाराष्ट्र राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था तंबाखूमुक्त जाहीर करण्याचा आदेश सर्व शैक्षणिक संस्थांना दिला आहे. तर चला मग आपले महाराष्ट्र राज्य जगातील पहिले तंबाखूमुक्त शाळांचे राज्य बनविण्यासाठी एकत्र प्रयत्न करूया!


## तंबाखूमुक्त भारतासाठी

# 'ऑनलाइन प्रशिक्षण'

तंबाखूमुक्त समाज बनवण्यासाठी सलाम मुंबई फाउंडेशन कटिबद्ध आहे. त्यासाठी विविध क्षेत्रातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत कार्य करीत आहोत. शिक्षक, अंगणवाडी सेविका, सार्वजनिक आरोग्य कर्मचारी, स्थानिक स्वयंसेवी संस्था आणि सरपंच अशा अनेक सामाजिक घटकांना एकत्र घेऊन तंबाखूमुक्त भारताचे स्वप्न साकारले जात आहे. या सर्व प्रक्रियेची पहिली पायरी म्हणजे प्रशिक्षण असते. कार्यक्रमाची व्याप्ती पाहून सलाम मुंबई फाउंडेशनने ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला आहे. ह्यासाठी एक वेबसाईट निर्माण करण्यात आलेली आहे. हयासाठी **www.tobaccocontrolindia.com** ह्या वेबसाईटला आपण भेट देऊ शकता.





ही वेबसाईट दोन भाषांमध्ये (इंग्रजी आणि हिंदी) उपलब्ध आहे. ह्यात तंबाखूच्या प्रतिबंधांवर चार मॉड्युल्स आहेत. ह्या वेबसाइटवर आपण आपल्या मोबाइल नंबरद्वारे नोंदणी करू शकता आणि कोर्सेस भागात जाऊन मॉड्युल्स पूर्ण करू शकता. एकदा आपण हे चार मॉड्युल्स पूर्ण केले की आपण डिजिटल प्रमाणपत्रासाठी पात्र ठरता.




मॉड्युल्समध्ये तंबाखू आणि त्याचे दुष्परिणाम, तंबाखू नियंत्रण कायदे, तंबाखूमुक्त शाळेसाठी आवश्यक निकष या सर्व विषयांवरील माहिती ऑडिओ व्हिज्युअल स्वरूपात उपलब्ध आहे. मूलभूत इंटरनेट कनेक्शनसह किंवा स्मार्ट फोनवर प्रशिक्षण घेण्यास देखील ही सुविधा उपलब्ध आहे. प्रत्येक मॉड्युल वाचून झाल्यानंतर एक परीक्षा द्यावी लागते. त्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर तुम्ही पुढील मॉड्युल वाचू शकता किंवा पुढे जाऊ शकता. चारही मॉड्युल्समध्ये उत्तीर्ण झाल्यास आपण डिजिटल प्रमाणपत्रासाठी पात्र ठरता.

## म. गांधी व्यसनमुक्तीपर पुरस्कार मिळाल्याबद्दल

# हार्दिक अभिनंदन!!!







वसई तालुक्याचे ॲडिशनल एस.पी.श्री. विजयकांत सागर ह्यांना महाराष्ट्र शासनाचा म. गांधी व्यसनमुक्ती पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.



कोल्हापूर जिल्हयाचे जेष्ठ तज्ज्ञ मार्गदर्शक श्री. एकनाथ चंदर कुंभार हयांना महाराष्ट्र शासनाचा म. गांधी व्यसनमुक्ती पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

वॉइस ऑफ हल्लाबोल
FOR THE CHILDREN, BY THE CHILDREN
3 ● JUNE 2019
INITIATED BY SALAAM MUMBAI FOUNDATION

## कविता



### तंबाखूमुक्ती

ऐका हो ऐका, कहानी ऐका,
करुण मानवाची...
व्याधींनी ग्रासलेल्या,
या भल्या माणसाची...।। धृ ।।
तंबाखूचे करूनी सेवन
ओढून घेतला प्राण,
इलाज नाही आता कोठे ही
कशी न त्याला जाण...।। १ ।।
गुटखा खातो दिवसभर
अन् पचापच थुंकतो,
पसरवतो हवेत जंतू
अन् हवा दूषित करतो...।। २ ।।

सिगरेटचा मग धूर सोडतो,
अन् करतो तो प्रदूषण,
मरणाला मग कवेत घेतो
संपवितो आपलेच जीवन...।।३।।

मधुमेह, कॅन्सर, सारेच येऊन
कवटाळते मग त्याला,
शेवटी तो तसाच निघतो
यमा घरी जाण्याला...।। ४ ।।

**शब्दरचना**
**सौ. जया नेरे,**
नवापूर, जि. नंदुरबार

**दरवर्षी प्रमाणे यंदाही ३१ मे २०१९ रोजी सलाम मुंबई फाउंडेशने अंबुजा एज्युकेशन इन्स्टिट्यूट आणि नरोत्तम सेखसरिया फाउंडेशनच्या सहयोगाने महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल, राजस्थान ह्या राज्यांमध्ये जागतिक तंबाखूविरोधी दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. तंबाखूविरोधी जनजागृती करण्यासाठी सिव्हिल हॉस्पिटल, जिल्हा परिषद कार्यालय आणि सरकारी कार्यालये यासारख्या सार्वजनिक ठिकाणी भिंतीवर तंबाखूविरोधी चित्रमय संदेश रंगवण्यात आले. तसेच प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शिक्षण, आरोग्य आणि एन.टी.सी.पी. विभागातील अधिकाऱ्यांनी सर्व ठिकाणी उपस्थिती दर्शविली.**




**धार, मध्यप्रदेश - भोज शोध संस्थानद्वारे विविध शासकीय इमारतींवर चित्रमय संदेश**




**धारवाड, कर्नाटक - विनायक काका जोशी संस्थेद्वारे विविध शासकीय इमारतींवर चित्रमय संदेश**




**भोजपूर, बिहार - दिशा एक प्रयास संस्थेद्वारे तंबाखूमुक्त समाज निर्मितीसाठी सह्यांची मोहीम**



**सतना, मध्यप्रदेश - दीनदयाळ रिसर्च इन्स्टिट्यूटद्वारे गावागावांमध्ये पोस्टर आणि स्लोगन स्पर्धांचे आयोजन**





**चिडावा, राजस्थान - अंबुजा सिमेंट फाउंडेशनद्वारे रॅलीचे आयोजन**



**कोडिनार, गुजरात - अंबुजा सिमेंट फाउंडेशनद्वारे जनजागृती उपक्रमाचे आयोजन**

## अंजलीचे बाबांना व्यसनमुक्तीसाठी पत्र.



**प्रति,**
**तीर्थरूप बाबांस**
**शिरसाष्टांग नमस्कार.**

वि. वि. पत्र लिहण्यास कारण की आमची शाळा तंबाखूमुक्त आहे. तंबाखू खाल्ल्याने कर्करोग व इतर रोग होतात. शरीराची हानी होते. त्यामुळे बाबा मी तुम्हाला विनंती करते की जर तुम्ही तंबाखूचे सेवन केले तर आपल्या कुटुंबाचीसुद्धा हानी होऊ शकते. त्यामुळे मी तुम्हाला विनंती करते की तुम्ही स्वत:साठी व आपल्या कुटुंबासाठी तंबाखू खाणे सोडून द्यावे. या विषयावर आम्हाला आमच्या शाळेतील घोगरे सर नेहमी मार्गदर्शन करत असतात.



आपली लाडकी,
**कु. अंजली विजय जाधव**
जि. प. प्राथमिक शाळा महेबुबखेडा,
गंगापूर -औरंगाबाद.
मार्गदर्शक - श्री. घोगरे सर.






**सलोनी चिनमुरे**
शाळा - सौ. आशालता आ. उपाध्ये गर्ल्स हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय, कुपवाड, ता. मिरज, जि.सांगली
इयत्ता - ७ वी







**सानिका साबळे**
शाळा - सौ. आशालता आ. उपाध्ये गर्ल्स हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय, कुपवाड, ता. मिरज, जि.सांगली
इयत्ता - ८ वी



## रोटरी क्लब कोल्हापूरचा अभियानाला मोलाचा हातभार



कोल्हापूर जिल्हयातील शाळा ह्या तंबाखूमुक्त जाहीर करण्यासाठी अनेकांचे प्रयत्न सुरू आहेत. शाळा तंबाखूमुक्त करण्यासाठी शालेय परिसरात तंबाखूमुक्तीचे तीन फलक लावणे अनिवार्य आहे. ही बाब ओळखता रोटरी क्लब, कोल्हापूरचे अध्यक्ष **श्री. अमित माटे** हयांनी कोल्हापूर जिल्ह्यातील ५० शाळांसाठी तंबाखूमुक्त फलक देण्याचे मान्य केले. रु. ४५००० खर्च करून ह्या ५० फलकांची निर्मिती करण्यात आली. जिल्हयाच्या शिक्षणाधिकारी **मा. आशा उबाळे** ह्यांच्यामार्फत करवीर तालुक्यातील शाळांना ह्या फलकांचे वाटप केले गेले. रोटरी क्लब कोल्हापूर आणि श्री. अमित माटे ह्यांचे अभियानातील सहकार्यासाठी धन्यवाद!

# REAL HEROES



## डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी

### तंबाखूमुक्त शाळा अभियानाचे प्रेरणास्त्रोत




२०१३मध्ये ग्रामविकास मंत्रालयात उपसचिव पदावर असल्यापासूनच **डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी** साहेबांनी तंबाखूमुक्त अभियानास दिशा देण्याचे कार्य केले आहे. यवतमाळमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्य करीत असताना, २७ ऑगस्ट, २०१५ला एका सत्कार समारंभात कलशेट्टी साहेब म्हणाले होते की 'शाळा ही नेहमी तंबाखूमुक्तच असली पाहिजे.' त्यांच्या प्रेरणेतून २६ जानेवारी, २०१७ला यवतमाळ जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा 'तंबाखूमुक्त शाळा' म्हणून घोषित करण्यात आल्या.

साहेब स्वत: शाळांमध्ये भेटी देऊन शाळा तंबाखूमुक्त आहेत की नाही त्याची चाचपणी करीत. शाळेच्या १०० यार्ड परिसरात तंबाखूविक्री करणाऱ्यांवर साहेब स्वत: कार्यवाही करीत. साहेबांच्या नेतृत्वात ३१ डिसेंबर २०१५ला 'तंबाखूमुक्त जीवन संकल्प अभियान' यवतमाळ जिल्ह्यातील २१०९ शाळांमध्ये घेण्यात आले, ह्यात साडे चार लाख विद्यार्थी, शिक्षक, पालक, अधिकारी ह्यांनी सहभाग नोंदविला. ह्या संकल्पाची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्येही झाली आहे.

नंदुरबार जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून रुजू झाल्यावर, साहेबांनी तंबाखूमुक्त अभियानासाठी विविध उपक्रमांची आखणी केली त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यात व्यसनमुक्तीचे सकारात्मक वातावरण निर्माण झाले. अनेक जण तंबाखूमुक्त झालीत. १५ ऑगस्ट २०१८ साहेबांच्या वाढदिवसा दिवशी नंदुरबार जिल्हा जगातील तिसरा तंबाखूमुक्त शाळांचा जिल्हा जाहीर केला. साहेबांच्या अभियानातील महत्त्वपूर्ण योगदानाकरिता 'नरोत्तम सेखसरिया फाउंडेशनचा राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करून त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

## दिलीप बघेले

### तंबाखूमुक्तीचा एक निर्धार





गोंदिया जिल्ह्याची तंबाखूमुक्त शाळेच्या दिशेने वाटचाल वेगाने होत आहे आणि त्याचे श्रेय हे जिल्ह्याचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी **श्री. दिलीप बघेले** ह्यांना जाते. गोंदिया जिल्ह्यात तंबाखूमुक्त शाळा अभियानांतर्गत २४ जुलै २०१८ला झालेल्या बैठकीमध्ये श्री. दिलीप बघेले ह्यांनी स्वत: खर्रा सोडल्याची घोषणा करून अभियानाची धुरा त्यांनी स्वत:च्या खांद्यावर घेतली. आजतागायत त्यांचा निर्धार अखंड राहिलेला आहे.

बघेले सर गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, तज्ज्ञ मार्गदर्शक, शिक्षक ह्यांच्या विविध सभांमध्ये स्वत: उपस्थित राहून जिल्ह्यातील सर्व शाळा तंबाखूमुक्त होण्याकरिता आवाहन करीत आहेत. जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी **मा. श्री.उल्हास नरड** ह्यांच्या आदेशामार्फतजिल्ह्यातील शाळांमध्ये तंबाखूविरोधी विविध उपक्रम राबविले आहेत. बघेले सरांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे 'टोबॅको फ्री स्कूल ॲपवर' जिल्हयातील ६२ टक्के शाळांनी नोंदणी करून, त्यातील १८ टक्के शाळा तंबाखूमुक्त जाहीर झाल्या आहेत.

ह्या अभियानात आरोग्य विभाग, तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, आरोग्य प्रबोधिनी संस्था हयांचे सहकार्य लाभत आहे. लवकरच गोंदिया जिल्हा हा 'तंबाखूमुक्त शाळांचा जिल्हा' म्हणून घोषित होईल.

## राहुल रेखावार

### तंबाखूमुक्त समाज निर्मितीसाठी उत्कृष्ट व्यक्तिमत्त्व





'तंबाखूमुक्त शाळा अभियान' हे शासकीय उपक्रम नाही; तर ते एक ईश्वरी कार्य आहे असे मानणारे **श्री. राहुल रेखावार** जी धुळे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आहेत. देशाची नवी पिढी व्यसनमुक्त राखायची असेल तर मुलांवरती 'व्यसनमुक्तीचे संस्कार' हे त्यांच्या संस्कारक्षम वयातच व्हायला पाहिजे; आणि ह्याच विचारांनी रेखावार साहेबांनी 'तंबाखूमुक्त शाळा अभियान' धुळे जिल्ह्यात पोटतिडकीने राबविले.

शिक्षण विभागाच्या 'एक पत्र व्यसनमुक्तीसाठी' हा उपक्रम धुळे जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने राबविला जावा ह्यासाठी साहेबांनी जातीने लक्ष दिले. साक्री तालुक्यातील केंद्रप्रमुखंची सभा घेऊन, शाळा तंबाखूमुक्त करण्यात येणाऱ्या अडचणी समजावून घेत, तिथे मार्गदर्शन केले. ह्याचा परिणाम असा झाला की केवळ दोन महिन्यांत साक्री तालुक्यातील ६०० हून अधिक शाळा ह्या तंबाखूमुक्त म्हणून घोषित झाल्या. जिल्ह्यातील शाळांच्या १०० यार्ड परिसरातील अवैध पानटपऱ्या साहेबांच्या निर्देशामुळे हटल्या गेल्या.

शासकीय कार्यालयांत होणारे तंबाखूजन्य पदार्थ सेवन रोखण्यासाठी कार्यवाही केली. रेखावार साहेबांच्या प्रेरणेमुळे आणि जिल्हयातील शिक्षण आणि आरोग्य विभागाच्या कार्यतत्परतेमुळे धुळे जिल्हा हा जगातील चौथा तंबाखूमुक्त शाळांचा जिल्हा बनला आहे.

## बी. व्ही. शिंदे

### ... अन् माझी तंबाखू सुटली !



खोडकर मुलास ज्या प्रकारे मॉनिटर बनविले जाते. तसेच तंबाखूमुक्त सेवन करणाऱ्या व्यक्तीस म्हणजे मलाच माझ्या मुख्याध्यापकांनी तंबाखूमुक्त शाळा उपक्रमाचे दायित्व दिले. सुरुवातीला मला प्रचंड राग आला. शाळेत विद्यार्थ्यांना, सहकारी शिक्षकांना आणि कर्मचाऱ्यांना मी सर्वांना आर्वजून सांगायचो की शाळेत अभियान सुरू झाले आहे, आपण व्यसनमुक्त राहिले पाहिजे.

तंबाखूच्या दुष्परिणामांची माहिती जेव्हा मी विद्यार्थ्यांना सांगायचो तेव्हा मनात असे वाटायचे की 'दुसऱ्या शिकवी ब्रह्ज्ञान, आपण मात्र कोरडे पाषण.' तेव्हाच मनाशी खूणगाठ बांधली हे तंबाखूचे व्यसन सोडायचे आणि आपण निर्व्यसनी आयुष्य जगायला सुरुवात करायची. हे करत असताना काही काळ खूप त्रास झाला. मनाची चलबिचल वाढली.

आता जवळ जवळ दीड वर्षे मी तंबाखूपासून दूर आहे. व्यसनाच्या मागे जाणारा माझा पैसा वाचला. ह्याचे सर्व श्रेय **मा. मुख्याध्यापक श्री. टी. एस. माळी सर** हयांना जाते. माझ्या कुटुंबीयांनाही आनंद झाला आहे.

## शुभ संदेश



### डॉ. अतुल साळुंके

राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, (रासेयो) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

“ **राष्ट्रीय सेवा योजना** विद्यार्थ्यांना व समाजाला व्यसनांपासून दूर राखण्यासाठी प्रयत्न करत आहे. आज 'तंबाखूमुक्त शाळा अभियानाद्वारे' आपण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांवर व्यसनमुक्तीचे संस्कार देण्यासाठी कटिबद्ध आहोत. मी व्यक्तिश: कोणत्याही प्रकारच्या व्यसनांपासून अलिप्त आहे. आपणांस विनंती करतो की निरोगी जीवनासाठी आपणही व्यसनांपासून दूर रहावे. सुदृढ आणि स्वस्थ भारतासाठी राबविल्या जाणाऱ्या 'तंबाखूमुक्त शाळा अभियानास' माझ्या हृदयपूर्वक शुभेच्छा!

“ भारताच्या थोर संत परंपरेद्वारे, समाज सुधारकांद्वारे आपल्याला व्यसनांपासून दूर राहण्याचा संदेश मिळत असतो. तरीही अनेकजण विविध व्यसनांच्या अधीन जात आहेत, ही अतिशय क्लेषदायी बाब आहे. महाराष्ट्राची नवी पिढी व्यसनांपासून दूर राहावी, सशक्त बनावी ह्यासाठी शालेय शिक्षक तळमळीने प्रयत्न करीत आहेत ती अत्यंत सुखद गोष्ट आहे.

मी महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांना ह्या कार्यासाठी सलाम करते आणि अभियानास मन:पूर्वक शुभेच्छा देते!



### उत्तरा केळकर

सुप्रसिद्ध पार्श्वगायिका



### समीर चौगुले

अभिनेता

“ देवाने आपल्याला इतके सुंदर जीवन दिले आहे ते तंबाखूसारख्या घाणेरड्या व्यसनापायी खराब करता कामा नये. कॅन्सरसारख्या रोगामुळे केवळ पेशंटवरच नाही; तर त्यांच्या परिवारावर वाईट परिस्थिती ओढावते.

आपल्या सर्वांना एक विनंती आहे की तंबाखूचे व्यसन लवकरात लवकर सोडा!

'Printed and published by Rajashree Sandeep Kadam on behalf of Salaam Mumbai Foundation, and printed at Prime Printers, A-5, Byculla Service Industrial Estate, Dadoji Konddev Cross Road, Byculla (E), Mumbai- 400 027. Published at 1st Floor, Nirmal Building, Nariman Point, Mumbai - 400021. Telephone Nos: 61491900; Fax No: 22044931.
Reproduction in whole or in part without the written permission of the publisher is prohibited.
Editor- Rajashree Sandeep Kadam | MAHMUL03157/13/1/2013-TC